INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

October 2021

E-ISSN - 2348-7143

47 C

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue : 278

**Multidisciplinary Issue**



**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' *International E- Research Journal*
Issue : 278
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
October- 2021

## INDEX


| No. | Title | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| | **English Section** | | |
| 01 | On Summation of Cardinalities of Subsets of A Finite Set | **Prof. Parshuram Ahire** | 05 |
| 02 | Application of Sawi Transform to Solve Partial Differential Equations with Variable Coefficient | **Prof. R. A. More** | 09 |
| 03 | Ethanobotanical Studies on Bombax Ceiba L. among the Indigenous People of Nizamabad and Kamareddy District. Telangana State | **Shivraj K. Bembrekar, Vijigiri Dinesh** | 13 |
| 04 | Crustacean Zooplankton Diversity in Relation to Physico-Chemical Parameters in Nandur Madhmeshwar Dam, Niphad Dist.Nashik | **Prof. S. B. Girme** | 16 |
| 05 | Some Properties in Fourier Transform | **S. R. Gadhe** | 24 |
| 06 | Problems of Online Learning During Covid-19 Pandemic Period in Tribal Areas : A Case Study of Nandurbar District | **Dr. Uttam Nile, Dr. Santosh Shukla** | 29 |
| 07 | Impact of Advertisement on Consumer Purchasing Power | **Prof. Dr. Y. B. Chavan, Trupti Vijay Deo** | 38 |
| 08 | Development of Multimedia Package in Teaching History Subject at Secondary Level | **Prof. Chhaya Gadwe** | 44 |
| 09 | Psychoanalytical study of Amrita in Shobhaa De's *Sethji* | **Smt Sapna Ravte** | 48 |
| 10 | The Critical Study of *Hamlet* | **Prof. J. R. Jagtap** | 53 |
| 11 | The Critical Analysis of *Yayati* | **Prof. T. V. Pawar** | 57 |
| 12 | Modern Indian Poetry in English : A Note | **Prof. T. B Bidgar** | 60 |
| 13 | Kashmir Issue and Article 370 | **Dr. S. M. Devare** | 64 |
| 14 | Main Changes and Challenges of the New National Education Policy in Respect of Higher Education | **Dr. Mahendra Agale** | 71 |
| 15 | Machiavellianism Trait of Sports-Persons | **Dr. Abhimanyu Dhormare** | 75 |
| 16 | Open Access Repositories in Open-DOAR of Asian Countries (India, Japan, China, & Indonesia) : A Comparative Study | **Mr. Gautam Wani, Dr. Sudhir Astunkar** | 80 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 17 | मन्नू भंडारी के कथा साहित्य में कामकाजी नारी की स्थिति | **डॉ. संतोष पवार** | 90 |
| 18 | लघुकथाओ में कथ्य एवं भाषा का महत्त्व | **डॉ. कल्पना पाटिल** | 94 |
| 19 | 'मंगल भवन' उपन्यास में ग्राम जीवन का चित्रण | **प्रो. देविदास बामणे** | 99 |
| 20 | 'नदी के द्वीप' : प्रेम की मनोदशाओं का अंकन | **डॉ. रतन कुमार** | 107 |
| 21 | संजीव के साहित्य में भारतीय अंधविश्वास की समस्या | **डॉ. संतोष पवार** | 111 |
| | **मराठी विभाग** | | |
| 22 | मराठी संतांच्या भक्तिकाव्यातून अभिव्यक्त होणारी लोकतत्त्वे : एक दृष्टीक्षेप | **डॉ.के.एन. लोखंडे** | 116 |
| 23 | १९६० नंतरचे मराठी लोकसाहित्य | **डॉ. अंजली मस्करेन्हस** | 123 |
| 24 | लोकसाहित्यातील समाज जीवन | **डॉ. दीपक गायकवाड** | 130 |
| 25 | कविता महाजन यांची कविता | **डॉ. पद्मरेखा धनकर** | 134 |
| 26 | तौलनिक साहित्य संशोधनाचे तीन सिद्धांत | **प्रा. प्राची जोशी** | 139 |
| 27 | वसंत कानेटकरांच्या पौराणिक नाटकांतील व्यक्तिरेखांचे वेगळेपण (मत्स्यगंधा व नलदमयंती संदर्भात) | **डॉ. मीनाक्षी भोयर** | 145 |
| 28 | 'होय, मी स्त्री आहे !' पहिल्या तृतीयपंथीय प्राचार्यांचे हृदयस्पर्शी आत्मकथन | **प्रा. डॉ. संगीता शेळके** | 150 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | E-ISSN : 2348-7143
Issue : 278 | October- 2021
Peer Reviewed Journal

# लोकसाहित्यातील समाज जीवन

**डॉ. दीपक बबन गायकवाड**
श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पुणे
भ्रमणध्वनी क्र.९०४९०९७०३७
E-Mail- drdeepaksmm@gmail.com

**सारांश-**

साहित्य हा समाजाचा आरसा आहे असे म्हटले जाते. पण खऱ्या अर्थाने लोकसाहित्यातून समाजजीवनाचा आविष्कार होतो. समाजजीवन आणि लोक साहित्य यांचा घनिष्ठ संबंध आहे. लोकसंस्कृतीचा अविभाज्य घटक लोकसाहित्य आहे असे म्हणता येईल. लिखित साहित्याची परंपरा सुरू होण्याअगोदर मौखिक परंपरेतून लोकसाहित्यात समाजजीवन चित्रित झालेले दिसते.

**प्रास्ताविक-**

समाजजीवनातील विविध भावना व्यक्त होण्यासाठी लोकसाहित्य उदयास आले. विविध परंपरा भारतीय लोकजीवन लोकसंस्कृती अभ्यासासाठी लोकसाहित्याचे योगदान महत्त्वाचे आहे. परंपरागत लोकजीवन तपासत असताना लोकसाहित्य महत्त्वाची भूमिका निभावते, म्हणूनच समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाश्चात्त्य लोकसाहित्य अभ्यासकांनी अभ्यास केलेला दिसून येतो. हा अभ्यास मर्यादित नसून व्यापक आहे. सांस्कृतिक जीवन लोकजीवन सतत बदलत असते. एका शतकातून दुसऱ्या शतकात जात असताना समाज जीवन बदललेले दिसते. प्राचीन लोकसाहित्याचा अभ्यास करताना धार्मिक जीवन, आर्थिक जीवन, आचार-विचार, वैचारिक ठेवण, विधी यामध्ये काळानुरूप बदल झालेले दिसतात.

**लोकसाहित्य आणि लोकजीवन-**

'लोकजीवनाशी निगडित असणे, लोकजीवनाचा त्यातून सतत आविष्कार होणे, लोकजीवनाचे अविभाज्य अंग असणे ही लोकसाहित्याची मूलभूत वैशिष्ट्ये आहेत.'[१] लोकसाहित्याचे अभ्यासक प्रभाकर मांडे यांनी लोकसाहित्य आणि लोकजीवन यांचा किती घनिष्ठ संबंध आहे हे सांगितले आहे. लोकांच्या जीवन जगण्याच्या पद्धती याचे चित्रण लोकसाहित्यात असते म्हणून जागतिक स्तरावर समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून लोकसाहित्याचा अभ्यास झालेला दिसतो. रशिया आणि जर्मनीमध्ये सोकोलोव, मिलर अशी काही अभ्यासकांची नावे सांगता येतील. याविषयी डॉ. विश्वनाथ शिंदे म्हणतात, 'लोकसाहित्याची निर्मिती समाजातील अशिक्षित लोकांकडून झालेली दिसते. त्यात कोणत्याही प्रकारचा औपचारिकपणा नसतो म्हणून लोकजीवनाचे चित्रण अधिक स्वाभाविकपणे लोकसाहित्यातून प्रकट होते. त्या त्या काळातील समाज जीवनाचा अभ्यास करताना लोकसाहित्यातील सामग्री उपयुक्त आहे असे अभ्यासकांच्या ध्यानात आल्याने लोकसाहित्याचा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून होऊ लागला.'[२] लोकसाहित्यातील सामाजिकता किती खोल रुजली आहे हे या विधानावरून स्पष्ट दिसून येते.

**लोकसाहित्य आणि सामाजिक जीवन-**

प्रामुख्याने समाजाच्या भावना आचार विचार व रूढी परंपरा आवडीनिवडी त्यांचे अभिरुची या सर्व बाबींचा शोध लोकसाहित्यातून घेता येतो. लोकसाहित्यातून समूह जीवणाचे चित्रण होत असल्याने सामाजिक जीवन समजून घेण्यासाठी लोकसाहित्य महत्त्वाची भूमिका निभावते. डॉ. विश्वनाथ शिंदे म्हणतात, ' मौखिक साहित्यात समूहाच्या भावभावनांचे अनुभवांचे ज्ञानाचे प्रतिबिंब जसे पडलेले असते तसेच समूहाच्या मनातील ब्रह्माचे, आभास सृष्टीचे, कल्पनेचे ही चित्र आलेले असते. त्यामुळे मौखिक वांग्मयाचा अभ्यास बदलत्या सामाजिक जीवनाचा संस्कृतीचा अभ्यास ठरतो. तो संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास ठरतो. त्यामुळे

सामाजिक आणि सांस्कृतिक अंगाने साहित्याचा अभ्यास करताना मौखिक साहित्याची सामग्री अतिशय मोलाची ठरते. संस्कृतीच्या सातत्याबरोबरच तिच्यात होणाऱ्या बदलाचाही हा अभ्यास असतो. माणूस आणि त्या भोवतालच्या चराचर सृष्टीचे ज्ञान, मौखिक साहित्याच्या अभ्यासामुळे होते. त्यामुळे लोकसाहित्याच्या अभ्यासाला महत्त्व प्राप्त होते.'[3] यावरून लोकसाहित्य आणि समाजीवन यांच्या अभ्यासाचे महत्त्व दिसून येते.

लोकसाहित्यात आविष्कृत होणाऱ्या सामाजिक जीवनाचे विविध पैलू पहावयास मिळतात. भाऊ-बहीण, भावजय, सासू-सून, आई-वडील, शेजारी यासारख्या नातेसंबंधाचे प्रेमपुर्वक तर कधी कटू प्रसंग लोकसाहित्यात चित्रित झालेले दिसतात. समाज जीवनातील चांगल्या कल्पना, काव्यरचना, निसर्गाविषयी आपुलकी, प्रेम, जिव्हाळा याही प्रतिमा दिसून येतात. लोककथा आणि लोकगीते हा लोकसाहित्याचा श्वास आहे. या कथा व लोकगीते प्रामुख्याने ग्रामीण जीवनाशी निगडित आहेत. ग्रामीण जीवनातील शेती संबंधीचे कामे विविध जाती धर्मातील स्त्री-पुरुषांचे जीवन, त्यांची कामे यांचे वर्णन लोकगीतीतून आढळते. लोककथा आहे त्या समाज समूहाशी, स्थानिक प्रादेशिक भागाशी, परिसराशी निगडित आहेत. कापूस वेचणाऱ्या मजुरांच्या गीतातून कामाचे वर्णन खालील प्रकारे साकार होते.

बाई कापूस वेचते | हाती बोंड धरुनी||
सकाळ वखतीला दिसला | भाईराया दुरुनी||

ग्रामीण भागातील कामाशी संबंधित अशी अनेक लोकगीते पाहायला मिळतात. खेड्यापाड्यात वाड्यावर व्यवसाय करणाऱ्या जाती जमातींचे सामूहिक कष्टमय जीवन लोकगीतातून स्पष्ट दिसून येते. साहित्यातून व्यक्त होणाऱ्या सामाजिक आविष्काराला धार्मिकतेचा स्पर्श झालेला दिसतो.

वेगवेगळ्या प्रकारच्या हिंदु देवतांना लोकसाहित्यात आदराचे स्थान दिल्याचे दिसते. 'लोकजीवनाचा आणि समाजजीवनाचा कौटुंबिक जीवन हा गाभा आहे. हे कौटुंबिक जीवन जेवढे निर्मळ तेवढे सत्वशील आणि जेवढे उदात्त तेवढेच मनुष्यमात्राचे आणि समाजजीवनाची अस्मिता दीप्तिमान, लोकहितैशी, पुण्यवान.'[4]

डॉ. कालभूत यांनी लोकसाहित्यातील कौटुंबिक जीवनाविषयी व्यक्त केलेले मत महत्त्वाचे आहे. प्राचीन काळापासून भारतीय कौटुंबिक सामाजिक जीवनाचे चित्रण लोकसाहित्यात भरलेले आहे. कौटुंबिक भावनेचा रोचक व मनोधैर्य प्रेरक व बोधक अविष्कार ही पहावयास मिळतो.

**लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती-**

लोकसाहित्य लोकसाहित्य या नाण्याच्या दोन बाजू आहेत. 'लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास आहे. संस्कृतीचे सातत्य आणि तिच्यात होणारे बदल याचे निरीक्षण करावयाचे तर ते लोकसाहित्यात करावे. मानव व त्याच्या सभोवारची चराचर सृष्टी तिचे नाते लोकसाहित्याच्या अभ्यासानंतर विशेष लक्षात येते.'[5] दुर्गाबाई भागवत यांनी लोकसंस्कृती विषयी व्यक्त केलेले मत लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाचे वाटते.

लोकसंस्कृतीचा अभ्यास म्हणजे एक प्रकारे समाजाच्या सांस्कृतिक घटकांचा सविस्तर अभ्यास असतो. लोकसंस्कृतीच्या विविध अंगांचा अभ्यास लोकसाहित्यात होतो. भारताची लोकसंस्कृती अतिप्राचीन व प्रगल्भ आहे. प्रत्येक प्रांत, प्रदेशात विविध स्वरूपात लोकपरंपरा पहावयास मिळते. यासंदर्भात दुर्गाबाई भागवत लिहितात, 'भारताची संस्कृती अतिप्राचीन व प्रगल्भ आहे. प्रांतोप्रांती प्रतीत होणारी लोकपरंपरा व वैदिक संस्कृती यांच्यातले सातत्य व वैषम्य याची चाचणी करण्याचा प्रयत्न कसोशीने केलेला आहे. वेदकाळापासून तो आत्तापर्यंत मिळाले तेवढे कथा वांग्मय अभ्यासताना एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात आली की, लोकसाहित्याच्या प्रांगणात ज्या भारतीय संस्कृतीचे दर्शन होते ती संस्कृती वेदकाळापासून व आतापर्यंत एकाच गुणाची, वाणाची, कसाची आहे. भारतीय संस्कृतीचे अंतरंग एकरूप आहे. तिचे स्वरूप अविभाज्य आहे. कालमानाचे अंतर हे रूप बदलू शकले नाही. धर्म ते सांगू शकले नाहीत. प्रांतीय आचार किंवा भाषाभेद केवळ नावापुरते आहेत.

E-ISSN : 2348-7143
October- 2021

सांस्कृतिक दृष्ट्या हजारो वर्ष एकात्म प्रांतिक भेद आहेत, परंतु ते केवळ रुची वैचित्र्य दाखवतात. शरीराच्या भिन्न अवयवात भेद असला तरी त्याची कार्य भिन्न असली तरी, जो समन्वय त्यांच्यात आढळतो. त्याच तऱ्हेचा समन्वय भिन्नता असूनही लोकसाहित्यातून प्रतीत होणाऱ्या संस्कृतीत दिसतो.'[६] भारतीय लोकसाहित्यातील लोकसंस्कृतीची परंपरा व तिचे स्वरूप यावरून अधोरेखित होते. लोकसाहित्यातील ही लोकसंस्कृती जपून ठेवले पाहिजे. या लोकसंस्कृतीने लोकजीवन समृद्ध केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही लोकसाहित्य ही आपल्या संस्कृतीची संपत्ती आहे ती जपून ठेवली पाहिजे, त्यात आपला पूर्व इतिहास आहे असे म्हटलेले आहे. यावरून लोकसाहित्य लोकसंस्कृती यांचा संबंध लक्षात येतो.

**लोकसाहित्य आणि धार्मिकता-**

देव- देवता आणि धर्म याविषयीची लोकसाहित्यातील मांडणी एक विशेष आहे. गोंधळी, बहुरूपी, वासुदेव, पौराणिक कथा, उद्देशपर कथा , देवताविषयक श्रद्धा यांचे आलेले वर्णन हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. यातून समाजातील व्यक्तींच्या धार्मिक भावना प्रतिबिंबित झालेल्या दिसतात. समाजातील विविध समजुती, उत्सव यांचा संबंध धार्मिकतेशी जोडलेला दिसतो. विशिष्ट देवाच्या किंवा देवीच्या कोपामुळे संकटे येतात. विशिष्ट रोग होतो. त्यामुळे इच्छा नवस पूर्ण केल्या पाहिजेत, पशुबळी दिले पाहिजेत, अशा प्रचलित रूढी विशिष्ट प्रदेशानुसार दिसून येतात. धार्मिकते बरोबर देवता ही लोकवांग्मयाची दुसरी प्रेरणा दिसून येते. याबद्दल डॉ. कालभूत म्हणतात, ' लोकसाहित्यातून व्यक्त होणाऱ्या लोकजीवनाला धार्मिकतेचा स्पर्श झालेला दिसतो. या लोकजीवनावर धार्मिक परंपरा, पुराणे, ग्रामीण देव-देवता यांचा प्रभाव पडलेला दिसतो. देव देवतांविषयांची श्रद्धा अनेक लोकगीतातून व्यक्त झालेली आहे. निरनिराळ्या जाती-जमातीतील विधी लोकगीतांशी संबंधित आहेत. या विविध जमातीतील विधी, प्रथा लोकसाहित्यातून आकारास येतात. खंडोबा, म्हसोबा, आसरा, सटवाई, मरीआई इत्यादी ग्रामदेवता विषयीची श्रद्धा आदरणीय आहेत. अंधश्रद्धेच्या पोटी समाजात प्रचलित असणारे काही असुरी विधी, बळी देण्यामागच्या प्रथांचा उल्लेख लोकसाहित्यात आढळतो. काही अंधश्रद्धा, रूढी, प्रथा समाजजीवनात किती खोलवर रुजले आहेत याचेही ज्ञान लोकसाहित्यातून होते.'[७] लोकसाहित्य आणि धर्म याचा किती निकटचा संबंध आहे हे यावरून लक्षात येते.

**समारोप-**

मानवी जीवनातील अत्यंत सहज सोपा असलेला प्राकृतिक आविष्कार म्हणजे लोकसाहित्य होय. लोकसाहित्याच्या अभ्यासामुळे त्या त्या समाजाचा पूर्व इतिहास त्यातील बारकावे रुढी-परंपरा, धार्मिकता, समाजशास्त्रीय दृष्टिकोन अभ्यासता येतो. म्हणून जागतिक पातळीवर लोकसाहित्याच्या अभ्यासाला महत्त्व प्राप्त झाले आहे. समाजातील विविध वैशिष्ट्यांचा पैलूंचा अभ्यासाला यामध्ये गती प्राप्त झाली आहे. लोकसाहित्यमुळे समाजमन एकत्रित दिसते, एकत्रित राहते. त्यामध्ये एक विचार राहतो. म्हणून लोकसाहित्याला समाज जीवनापासून आपण वेगळे काढू शकत नाही. समाजाचे हृदय म्हणून लोकसाहित्य कडे पाहिले जाते.

साधारणतः एकविसाव्या शतकात लोकसाहित्याची अत्यंत प्रतिष्ठित अभ्यासात गणना झाली. जागतिक स्तरावर अनेक अभ्यासकांनी यासाठी आपले आयुष्य खर्ची घातले. याचा प्रभाव जागतिक स्तरावर पडला. प्रत्येक देशाने या अभ्यासाकडे लक्ष वेधले. पारंपारिक वांग्मय, दैवतकथा, परीकथा, दंतकथा, कल्पितकथा, वाक्यसंप्रदाय, म्हणी, लोकसाहित्यातील वांग्मयीन ललित इत्यादींचा सखोल अभ्यास लोकसंख्येमुळे आजपर्यंत झाला आहे. यातूनच सामाजिक जीवन वाचकांसमोर खुले झाले आहे. लोकसाहित्यातील समाजजीवनाचे आलेले चित्रन, अभ्यासकांना, भविष्य काळातील संशोधकांना नक्कीच

प्रेरणादायी असणार आहे यात शंका नाही. यापुढील काळात अभ्यासक, संशोधकांनी आपआपल्या प्रदेशातील लोकसाहित्य जपून ठेवले पाहिजे. त्यावर अभ्यास करून ते समाजासमोर आणले पाहिजे. जेणेकरून पुढील अनेक पिढ्यांना ते मार्गदर्शक ठरेल व त्यातून तत्कालीन सामाजिक ऐक्याचे वास्तव चित्रण समोर येईल असे वाटते.

**संदर्भ-**

1. डॉ. मांडे प्रभाकर, 'लोकसाहित्याचे अंतःप्रवाह', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, 2008. पृष्ठ क्र. 313
2. डॉ. शिंदे विश्वनाथ, 'लोकसाहित्य मीमांसा', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, 1998, पृष्ठ क्र. 14
3. 'लोकसाहित्यमीमांसा' पृष्ठ क्र. 32
4. डॉ. काळभूत पुरुषोत्तम, 'लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन', विजय प्रकाशन, नागपूर, 2007, पृष्ठ क्र. 302
5. भागवत दुर्गा, 'लोकसाहित्याची रूपरेखा', वरदा बुक्स, पुणे, 1977, पृष्ठ क्र. 8
6. 'लोकसाहित्याची रूपरेखा', पृष्ठ क्र. 10
7. 'लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन', पृष्ठ क्र. 307